# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 22 April 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २२ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- नागरी सेवा परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल जाहीर- पुण्याच्या अर्चित डोंगरेचा देशात तिसरा तर राज्यातून पहिला क्रमांक
- राज्यात पहिली ते पाचवीच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये हिंदी भाषा ऐच्छिक
- मत्स्यव्यवसायाला राज्यात कृषीचा दर्जा–शेतीप्रमाणे सर्व लाभ घेण्यात मत्स्य शेतकरी पात्र
- सस्ती अदालत, या उपक्रमासाठी तालुकास्तरीय समितीची स्थापना

आणि

- बीडमध्ये महाविद्यालयीन तरुणींच्या मदतीसाठी प्रत्येक महाविद्यालयात बडी कॉपची नियुक्ती

****

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल आज जाहीर झाला, पुण्याचा अर्चित पराग डोंगरे यानं देशात तिसरा तर महाराष्ट्रात पहिला क्रमांक पटकावला आहे. देशातून शक्ती दुबे हिने पहिला तर हर्षित गोयलनं दुसरा क्रमांक मिळवला आहे. या निवड चाचणीतून एक हजार नऊ उमेदवारांची विविध नागरी सेवांसाठी निवड झाली असून, त्यात प्रशासकीय सेवेसाठी एकशे ऐंशी उमेदवार, परराष्ट्र सेवेसाठी पंचावन्न उमेदवार आणि पोलिस सेवेसाठी एकशे सत्तेचाळीस उमेदवार निवडले गेले आहेत.

****

राज्यातील पहिली ते पाचवीच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये हिंदी भाषा अनिवार्य नव्हे तर ऐच्छिक ठेवणार असल्याचं, शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. केंद्र पातळीवर PM श्री शाळांच्या धर्तीवर राज्यात CM श्री शाळा योजना राबवणार असल्याचं भुसे यांनी सांगितलं.

****

मत्स्यव्यवसायाला आजपासून राज्यात कृषीचा दर्जा देण्यात आला आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याचं, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितलं, ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. या निर्णयामुळे राज्यातल्या चार लाख ८३ हजार मासेमारांना याचा फायदा होणार आहे. कृषीप्रमाणे मासेमारांना मत्स्यबीज खरेदी, खाद्य खरेदी, तसंच इतर साहित्य खरेदीसाठी अनुदान मिळेल, मत्स्य शेतकऱ्यांसाठी मत्स्य विमा योजना आणि नैसर्गिक आपत्ती आल्यास सरकारकडून मदतही मिळणार असल्याचं राणे यांनी सांगितलं.

****

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी सातारा जिल्ह्यात मौजे नायगाव इथं भव्य स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या स्मारकासाठी १४२ कोटी ६० लाख रुपये तर महिला प्रशिक्षण केंद्रासाठी ६७ लाख १७ हजार रुपये तरतूदीसही मंजूरी देण्यात आली.

महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२५ आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम, २०२५ ला मान्यता, तात्पुरत्या स्वरुपात स्थापन १६ अतिरिक्त आणि २३ जलदगती न्यायालयांना आणखी दोन वर्ष मुदतवाढ, तसंच विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयांतील कंत्राटी विधी अधिकाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यालाही आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

वक्फ कायद्यामुळे गरीब आणि गरजू मुस्लिमांना न्याय मिळेल, अशी ग्वाही केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. वक्फ सुधारणा कायदा २०२५ चा मूळ उद्देशच पूर्वीच्या कायद्यातील त्रुटी दूर करून वक्फ बोर्डाची कार्यक्षमता वाढवणं, हा असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं, ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू**

****

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या वतीनं घरगुती स्वच्छताविषयक आणि विशेष काळजीयोग्य कचऱ्यांचं संकलन सेवा कार्यान्वित केली जाणार आहे. यामध्ये सॅनिटरी पॅड्स, डायपर्स, बँडेजेस, कालबाह्य औषधं, ब्यूटी पार्लर्स मधला कचरा, अशा कचऱ्याचं वेगळं संकलन केलं जाणार आहे. मुंबईतल्या गृहनिर्माण संस्था, महिला वसतिगृहं, शैक्षणिक संस्था अशा आस्थापनांना नोंदणी करून या सेवेचा लाभ घेता येणार आहे.

****

मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ या दिवशी झालेल्या दहशतवादी हल्यात वीर मरण आलेले पोलीस शिपाई अंबादास पवार यांच्या पत्नी कल्पना पवार यांना परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक पदी नियुक्ती देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पवार यांना या पदावरच्या थेट नियुक्तीचे आदेश प्रदान केले.

****

बुलढाणा जिल्ह्यातल्या काही गावांमध्ये केस गळतीचे आणि त्यानंतर नख गळतीचे प्रकार वाढत असल्याच्या घटनांबाबत केंद्र सरकारच्या पथकानं सखोल तपास करून कार्यवाही करावी, असे निर्देश केंद्रीय आयुष, आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले. मेहकर इथे आज झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. रुग्णांना यासंदर्भात तातडीनं प्रतिबंधात्मक औषधोपचार सुरू करण्याचे निर्देशही जाधव यांनी दिले.

****

देशात सोन्याच्या किमतींनी आज प्रति तोळा १ लाख रुपयांची पातळी ओलांडली. कालच्या तुलनेत सोनं सुमारे अडीच हजार रुपयांनी महागलं. चांदीची किंमत सुमारे ९८ हजार ८०० रुपये प्रति किलो, इतकी नोंदवली गेली. जगभरातल्या केंद्रीय बँकांनी वाढवलेली सोनं खरेदी तसंच सोनं ही सुरक्षित गुंतवणूक असल्याची भावना, यामुळे गुंतवणूकदार सोनं खरेदीकडे वळत असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे.

****

पोप फ्रान्सिस यांच्या पार्थिव देहावर येत्या शनिवारी अंत्यसंस्कार होणार आहेत. रोम इथल्या सेंट मेरी मेजर बेसिलिका इथं अंत्यविधी होणार असल्याचं व्हॅटिकन चर्च कडून सांगण्यात आलं. व्हॅटिकन बाहेर अंत्यसंस्कार होत असलेले गेल्या शतकभरातले हे पहिलेच पोप आहेत.

****

बीडमध्ये महाविद्यालयीन तरुणींच्या मदतीसाठी आता प्रत्येक महाविद्यालयात बडी कॉप नियुक्त होणार आहे. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी बीड इथं पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन, याबाबतचे निर्देश दिले. या नियुक्तीमुळे पोलिस ठाण्यात न जाता, मुलींना छेडछाडीसारख्या प्रकरणी तक्रार करता येईल, असं गोऱ्हे यांनी सांगितलं. त्या म्हणाल्या –

**बाईट – नीलम गोऱ्हे, उपसभापती, विधान परिषद**

****

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या अध्यक्षतेखाली शेत आणि पाणंद याबाबत नागरिकांशी साधलेल्या संवादातून पुढे आलेल्या अडचणी सोडवण्यासंदर्भात, सस्ती अदालत, या उपक्रमासाठी तालुकास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. गावडे यांनी याबाबतचं परिपत्रक जारी केलं आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या अदालतीच्या कामकाजाचा नियमितपणे आढावा घेऊन दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत मासिक प्रगती अहवाल सादर करावा, असे निर्देशही विभागीय आयुक्तांनी दिले आहेत.

****

संवाद मराठवाड्याशी, या उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्त दिलीप गावडे उद्या, पाणीटंचाई आणि पाणीपुरवठा या विषयावर विभागातल्या नागरिकांशी थेट संवाद साधणार आहेत. उद्या दुपारी चार वाजता ऑनलाईन वेबिनारच्या माध्यमातून हे संवाद सत्र होणार आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सध्या १३८ गावं आणि १८ वाड्यांना टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. पाणी पुरवठ्यासाठी साठी जिल्ह्यातल्या १४४ खासगी विहिरी अधिग्रहित करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या जालना, परतूर, भोकरदन आणि घनसावंगी तालुक्यातल्या सरपंच पदासाठीची आरक्षण सोडत आज जाहीर करण्यात आली. २०२५ ते २०३० या कालावधीसाठी ही आरक्षण सोडत असणार आहे. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि खुल्या प्रवर्गातल्या जागांसाठी आरक्षण जाहीर करण्यात आलं असून, पन्नास टक्के सरपंच पदे महिलांसाठीसाठी

राखीव ठेवण्यात आली आहेत. अंबड आणि मंठा तालुक्यातल्या सरपंच पदाची आरक्षण सोडत काल जाहीर करण्यात आली होती.

****

नांदेड इथे आज जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात जनसुरक्षा विधेयक विरोधी समितीच्या वतीनं सत्याग्रह आंदोलन करण्यात आलं. शहरातल्या महात्मा फुले यांच्या पुतळ्याजवळ झालेल्या या आंदोलनात या समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते

छत्रपती संभाजीनगर इथंही जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष कृती समितीच्या वतीनं विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, हमाल मापाडी महामंडळ आदी पक्ष संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

****

बीड जिल्ह्यातल्या माजलगावचे ढाबाचालक महादेव गायकवाड यांच्या खून प्रकरणातल्या तीनही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. आज पहाटे पुणे जिल्ह्यातल्या आळंदीहून या आरोपींना बीडच्या स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अटक केली.

****